## बोदवड महाविद्यालयात रंगल्या बालपणाच्या आठवणी.
## 18 विद्यार्थी स्पर्धेत सहभागी .

(दि.12/09/19) मराठी विभागामार्फत आयोजित कार्यक्रमात बालपणाच्या गप्पागोष्टी या विषयावर स्पर्धा आयोजित करण्या आली.यात 18 स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून संत मुक्तबाई कला व वाणिज्य महाविद्याल मुक्ताईनगर येथील मराठी विभागातील डाँ. वंदना लव्हाळे उपस्थित होत्या.सदर कार्यक्रमाची भूमिका मराठी विभाग प्रमुख डाँ.रत्ना जवरास यांनी मांडली. अध्यक्षीय भाषणात प्रार्चायांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की,हा , आठवणींच्या ! प्रकारातून उद्याचे ललित लेखक निर्माण होऊ शकतात.सूत्रसंचालन कु.कोमल मांडवकरने केले.तर आभार डाँ.वंदना नँदवे यांनी मानले.या स्पर्धेला परीक्षक म्हणून हिंदी विभागातील डाँ.कामिनी तिवारी व न.ह.रांका हायस्कुल येथील प्रा.मीनाक्षी होले उपस्थित होत्या.







